# करोना, क्लायमेट क्रायसिस आणि आर्थिक प्रगती...

सुहास कोल्हेकर

या शिर्षकातल्या शब्दांचे नेमके नाते काय असा प्रश्न अनेकांना पडला असेल. यातला प्रत्येक शब्द हा केवळ शब्द नसून त्या संकल्पना आहेत व त्या समजून घेणे फारच महत्त्वाचे आहे. यातील प्रत्येक शब्दापाठोपाठ आपल्याला आणखीन कोणकोणते शब्द आठवतात, जरा विचार करुन बघुयांत.

१. करोना विषाणू .... कोव्हिड २०१९.... पँडेमिक..... सामाजिक आरोग्य...

**सार्वजनिक आरोग्य व्यवस्था**

२. पर्यावरण प्रदूषण..... जलवायु परिवर्तन (क्लायमेट चेंज)... क्लायमेट क्रायसिस...

हीट वेव्ह व प्रदूषणाचे आरोग्यावरील गंभीर दुष्परिणाम.

३. आर्थिक प्रगती.... जी.डी.पी. (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट म्हणजेच सकल घरेलू उत्पादन ... लॉकडाऊन...

....विकास( ?) प्रकल्प.....पर्यावरणाचा ऱ्हास व विस्थापन ...क्लायमेट क्रायसिस.

ही सर्व गुंतागुंत समजून घ्यायची तर आपण या सहविचाराची सुरुवात करूयात आपल्या अनुभवांवरून.

गेली काही वर्ष आपण अनुभवत आहोत, वाढते तापमान, अन् अवकाळी व एकदम धोधो पडणारा पाऊस, त्यामुळे येणारे फ्लॅश फ्लडस् म्हणजे थोडाच काळ पडणारा पण मोठ्ठा विनाशकारी पूर व त्यामुळे पिकांची नासाडी असे अनेक बदल. या सगळ्यांना आपण हवामान बदल म्हणजेच क्लायमेट चेंज असे म्हणायला लागलो. आता मात्र या विषयांत अधिक रस घेणारे धोक्याची घंटी वाजवित आपल्याला सांगू लागले आहेत की दिवसेंदिवस परिस्थिती क्लायमेट क्रायसिस म्हणावे एवढी भयावह झालेली आहे. ती अधिक बिघडून सर्वनाश होऊ नये म्हणून निदान स्लोडाऊन करण्याचा....विनाशाची गती कमी करण्याचा प्रयत्न करायचा तर आपण आपल्या देशातल्या व जगातल्या व्यवहारांमध्ये...व्यवस्थांमध्ये बदल करायला हवेत. खूप मोठ्या प्रमाणांत होणारे प्रदूषण, हवेतील कार्बनडायऑक्साईडची पातळी व पार्टिकल काऊंट म्हणजे धूळ-धूर यांचे प्रमाण मोजायला हवे. याचा अर्थ असा की वाहतूक करणाऱ्या वाहनांची चांगली देखभाल करणे व त्यांची संख्या मर्यादित करणे गरजेचे आहे, औद्योगिकीकरण, त्यातून होणारे प्रदूषण व सोबतच वाढत जाणारे शहरीकरण या सर्वांचा पुनर्विचार करायला हवा अगदी तातडीने. (लॉकडाऊनच्या निमित्ताने याचा प्रत्यय आपण घेतला.) असे न केल्यास सजीवसृष्टी असलेला एकमेव आपला ग्रह, आपली पृथ्वीच नष्ट होईल. याकडे अजूनही पुरेशा गांभीर्याने बघितले जात नाही; म्हणूनच जणू निसर्गाने स्वत:च आपले संतुलन पुन्हा मिळविण्याचा उपाय म्हणून की काय, कचिव्हड पँडेमिक ''अवतरला'' अन् सर्व जगभर अर्थचक्र थोपविण्यांत आली, गेले काही महिने.

आपण विसरून गेलो होतो ते पक्षांचे किलबिलाट आपल्याला सूर्योदयाची चाहुल देऊ लागले. दिल्लीतील हवा स्वच्छ झाली अन् गंगा यमुनांचे पाणी वाहू लागले. ठाणे ग्रामीण परिसरातली वाहनांची वर्दळ थांबली अन् शांत रस्त्यांवर हरीण-काळवीट सहपरिवार दिसू लागले. पूर्वी जंगल व्याप्त असलेल्या या परिसरेंवर जणू काही ते स्वत:चा पारंपारिक हक्कच सांगू लागले.

करोना.... जानेवारी, २०२०च्या अखेरीस जागतिक स्तरावर ज्याचा वेगाने प्रसार होत असल्याच्या बातम्या तुमच्या आमच्यापर्यंत पोहचल्य। तो हा नवा विषाणु. करोना व्हायरस नेमका आहे तरी कसा अन् तो आला असेल कुठून हे समजून घेऊयात. या विषाणूमुळे होणारा आजार २०१९च्या शेवटाकडे लक्षात आला म्हणून त्या विषाणूला (कोरोना व्हायरस डिसीजचा शॉर्ट फॉर्म म्हणून) कोव्हीड, २०१९ किंवा नॉव्हेल करोना

व्हायरस असेही म्हटले जाते. याचे आणखीन एक नाव आहे एस्‌एआर्‌सी-२ (सार्क-२). या विषाणूचा संसर्ग झाल्यावर सीव्हियर ॲक्यूट रेस्पिरेटरी सिंड्रोमची लक्षणे दिसतात पण या प्रकारच्या आजाराची काही वर्षांपूर्वी साथ आली होती, त्यापेक्षा याचे वेगळेपण दर्शविण्यासाठी याला सार्क-२असे म्हटले जाते. तर हा नवा विषाणू आला तरी कुठून हे समजून घेऊयात.

आपल्याला सर्दी-खोकला-ताप याचा त्रास देणारा फ्ल्यूचा..इन्फ्ल्यूएन्झा..हा करोनाचा जवळचा नातेवाईक म्हणता येईल. दोघेही आर्‌ एन्‌ ए व्हायरस व म्हणून त्यांत वारंवार अनुवंशिक बदल होण्याची शक्यता अधिक. करोना व्हायरस या विषाणू गटाचे वैशिष्ट्य असे की त्याला कवच असते. त्यातून काही प्रथिनयुक्त काटे बाहेर आलेले असतात. करोना व्हायरसेस हे काही प्राण्यांमध्ये आढळतात.

वटवाघूळ हा याचा मुख्य यजमान (होस्ट) असावा. वाढत्या जंगलतोडीमुळे दिवसेंदिवस वटवाघळांची संख्या कमी होत असल्यामुळे नवीन यजमानाच्या शोधात त्याने हे नवे उग्र रुप धारण केले असावे. २०१९ अखेरीस हा वायरस चीनच्या वुहान प्रांतातील बाजारांत संसर्ग झालेल्या माणसापासून अनेक माणसांमध्ये पसरत धुमाकूळ घालताना आढळला.

या नवीन उग्र रुपातील करोनासंदर्भांत आणखीन एक शक्यता सांगितली जाते ती अशी की, चीनच्या सीमा क्षेत्रांत वुहानजवळच अमेरिकेच्या पेंटॅगॉनची जी एम्‌ तंत्रज्ञान वापराची प्रयोगशाळा असून त्यांत जैविक शस्त्रास्त्रांचे (म्हणजे बायालॉजिकल वेपन्स) संशोधन चालते. कदाचित्‌ चुकून(?) हा नवा उग्र विषाणू निसटला असू शकेल. अर्थात या अतीगोपनीय व्यवस्थेची शहानिशा करणे अशक्य. मात्र मोदी-शहा सतत युद्धाची भाषा वापरतात, तेव्हा ही शक्यता नाकारता येत नाही. सध्या आर्थिक एकाधिकारशाही गाजविणारा अमेरिका उदयोन्मुख प्रतिस्पर्धी चीनला अशा आधुनिक काव्याने जेरीस आणण्यास मागे पुढे पाहणार नाही असे सहज वाटावे.

या प्रकारचे काही सूचक प्रतिसाद अध्यक्ष ट्रम्प प्रसारित करत असतात. तर असो...

क्लायमेट क्रायसेस, जंगलतोड व जनुकिय तंत्रज्ञानासारख्या नवनव्या तत्रज्ञानांचा अनियंत्रित वापर यामुळे अशी उत्क्रांती विविध रोगजंतूंमध्ये होऊन नवनवीन आजारांना मानवाला सामोरे जावे लागण्याची शक्यता यातून अधोरेखित होते, हे निश्चित.

**करोना संसर्ग व सामाजिक आरोग्य .....**

जगभरातील विविध देशांत वेगाने पसरलेल्या कोव्हीड आजाराची तीव्रता, मृत्यूची संख्या यामुळे समाजमानसांत मोठे भीतीचे सावट व गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मास्क कुणी कोणते वापरायचे कुणाला मास्कची गरज नाही याबद्दलच्या सतत बदलत्या निकषांमुळे त्यांत भर पडली. टीव्ही अन्‌ सोशल मिडियावरील अनअधिकृत बातम्यांचाही निश्चित वाटा आहे. मात्र हे सुद्धा खरेच की आम्हा अभ्यासकांकरिता व पेशन्टस्‌ सांभाळणाऱ्या सर्व यंत्रणेकरिता देखिल हा नोव्हेल करोना विषाणु अगदीच नवीन अनोळखी. त्याचे स्वरूप जसजसे उलगडत गेले तसतसे निकष बदलवणे क्रमप्राप्त ठरले. म्हणजे महागडे एन्‌ ९५ मास्क हे केवळ थेट पेशन्ट हाताळणाऱ्या डॉक्टर्स्‌- नर्सेस अशांकरिताच आवश्यक आहेत, त्याचा त्यांना तुटवडा पडू नये याकरिता जाहीर करावे लागले. पुढे संसर्ग झाला पण लक्षणे दिसत नाहीत अशा लक्षणरहीत वाहकांकडून करोनाचा संसर्ग होतो, हे कळल्यावर सर्वांनीच साधे कापडी मास्क अथवा रुमाल बांधून नाक व तोंड झाकावे, त्या शिवाय घराबाहेर पडूच नये याचा आग्रह धरावा लागला. नवीन माहितीनुसार हा बदल आवश्यक म्हणून. ज्येष्ठ नागरिक, लहानमुले व विविध आजारांमुळे प्रतिकारशक्ती कमी झालेले अन्य यांना लक्षणरहीत वाहकांकडून (असिमटोमोटिक कॅरिअर्सकडून) संसर्ग होण्याचा धोका अधिक म्हणून त्यांनी मास्क किंवा रुमाल बांधणे अत्यावश्यक.

अगदी सामान्यज्ञान अथवा शालेय विज्ञान आठवून थोडासा विचार केला तरी आपल्या सहजच लक्षात येते की कोणताही रोगजंतू हा धर्म, जात, लिंग असा भेदभाव करत नाही मात्र आपली असमान समाजव्यवस्था व त्यांचे भिन्न प्रतिसाद यामुळे मिळणाऱ्या अथवा नाकारल्या जाणाऱ्या सेवा यांत मात्र या विविध घटकांचा मोठा प्रभाव दिसून येतो. दर्जेदार आरोग्य सेवापर्यंत पोहचताच न येणे व त्या न परवडणे यांत परिवाराची सामाजिक व विशेषत: आर्थिक परिस्थिती हा सर्वांत महत्त्वाचा

मुद्दा ठरतो. मागील दशकभर सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या बजेटमध्ये सातत्याने कपात केल्यामुळे ती मोडकळीस आणण्यात आली. या बरोबरच कार्पोरेट हॉस्पिटलचा पसारा वाढत गेला. परिणामत: गोरगरिबांना आरोग्य सेवा नाकारल्या गेल्या. अनेक परिवारांना एका सदस्याच्या गंभीर आजाराचा उपचार करताना भूमिहीन व कर्जबाजारी होण्याची व दारिद्र्य रेषेखाली ढकलले जाण्याची पाळी आल्याचे विविध अभ्यासांतून जाहीर झाले आहे.

आर्थिक परिस्थिती जशी खालावते तशी आहारातील फळे, भाज्या व डाळी यांच्या प्रमाणांत घट केली जाते. एकंदर आहाराची मात्राही घटते. याचा परिणाम म्हणजे रोगप्रतिकार शक्ती कमी होते. अशा उपाशीपोटी कोणताही व्यायाम केल्याने रोगप्रतिकारशक्ती कशी वाढणार ?

लॉकडाऊन काळात मानसिक बळावर घर गाठू पाहणाऱ्या अनवाणी पायपिट करीत निघालेल्या असंघटित मजूरांचे-महिलांचे मृत्यू झाले त्यांची खरी आकडेवारी मिळाली तरी त्यांची नोंद भूकबळी म्हणून करण्याचा प्रमाणिकपणा शासन दाखवू धजणार का ? ज्या समाजघटकांना दीर्घकाळ भूक सहन करावी लागते व आरोग्यसेवा परवडत नाहीत त्यांत सामान्यत: रोगजंतूचा प्रसार अधिक होतो याची जाणीव सत्तेत असणाऱ्यांना नव्हती किंवा त्यांची परवाच नव्हती म्हणूनच ''मध्यरात्रीपासून राष्ट्रीय लॉकडाऊन'' अशी घोषणा रात्री आठ वाजता करण्यात आली, प्रशासनाला देखिल कोणतीही पूर्वसूचना न देता व लोक प्रतिनिधींनासुद्धा विश्वासात न घेता.

हा निर्णय तज्ञांच्या सल्ल्याने घेतल्याचे नंतर सांगितले जात असले तरी, हे तज्ञ नेमके कोण हे गूढ कायम आहे. करोनाचे संकट हा पब्लीक हेल्थचा प्रश्न असून आरोग्य क्षेत्रातील कुणीही असा संपूर्ण राष्ट्रीय लॉकडाऊनचा सल्ला दिला नसल्याचे स्पष्ट आहे. अचानक लॉकडाऊन सुरू झाल्यावर नाईलाजाने रेशन घ्यायला गेलेल्या वयस्क आदिवासीला ज्या पद्धतीने बेदम मारहाण करण्यात आल्याचे प्रसंग घडले, त्यावरून करोना पॅडेमिक हा ''लॉ अँड आंर्डर''चा प्रश्न असल्याप्रमाणे आदेश दिले गेल्याचे स्पष्ट होते. पोलिसांच्या व तथाकथित लेकप्रतिनीधींच्या संवेदनहीनतेच्या अगणित घटनांचा धिक्कार करावा तेवढा थोडाच.

करोनाच्या साथीला आळा घालण्याचा काहीही उपाय हाताशी नाही व आपली खिळखिळी सार्वजनिक आरोग्यव्यस्था येणाऱ्या रोग्यांच्यावर इलाज करण्यास सक्षम करण्यासाठी वेळ मिळवण्याकरिता हा राष्ट्रीय लॉकडाऊन जाहीर करुन ''घरीच रहा, सुरक्षित रहा'',

... ''दो गज की दूरी, है जरुरी'' अशी भाषणबाजी करत, टाळ्या-थाळ्या, अती कामाने बेजार डॉक्टर व नर्सेसवर हेलिकॉप्टरनधून फुलांचा वर्षाव अशा मूळ प्रश्नांपासून जनतेचे लक्ष वळविण्याच्या कसरती केल्या गेल्या.

साथीच्या प्रसाराची गती कमी करण्यात फिजिकल डिस्टन्सिंग म्हणजे दोन व्यक्तींत अंतर राखणे याने नक्कीच मदत झाली खरी पण सोशल डिस्टन्सिंग वाढविण्याचा सत्ताधारी पक्षाचा अजेंडा मात्र चुकीच्या शब्दरचनेमुळे उघड झाला. माध्यमांना हाताशी धरून तबलिगींच्या नावाने बोंबा मारत धर्माच्या नावाने विद्वेश पसरविण्याचा प्रयत्न नंतर मागे घेणे भाग पडले व भाषा बदलावी लागली.

जून अखेरपर्यंतचा लॉकडाऊनचा आता पाचवा टप्पा संपत आला, ८० दिवसांचा दीर्घ काळ संपत आला मात्र करोना प्रसाराला म्हणावा तितका लगाम अजूनही घालता आलेला नाही. अखेर आता ''करोनावर मात'', ''करोनाला युध्दात हरवणारच'' ही भाषा सोडून देत करोना सह जगायला शिकणे असे बदल करावे लागले.

करोनाच्या संकटाला सामोरे जाण्याची सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची तयारी नसतानाही ज्या जिकीरीने व कष्टाने वैद्यकीय व स्वच्छता कर्मचाऱ्यासह , रुग्णवाहिका चालक व आशा वर्कर्ससारख्या अनेकांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून प्रयत्न केलेत त्या सर्वांना अगदी मन:पूर्वक सलाम. आशियातील सर्वांत मोठी झोपडवस्ती असलेल्या धारावीत करोनाला नियंत्रणांत आणण्याचा प्रयत्न यशस्वी झाल्यामुळे इतर वस्त्यांमधील कार्यकर्त्यांना आता संपूर्ण मुंबईतही साथ आटोक्यात आणता येणे शक्य आहे हा विश्वास निर्माण झाला आहे.

करोना पॅडेमिक व आर्थिक प्रगती...... करोनाचा उदय झाला त्यावेळी म्हणजे २०१९च्या शेवटाकडे आपल्या

देशाची अर्थ व्यवस्था खालावलेलीच होती. सीएए व एन्आर्सी विरोधांत देशभरातील तरुणाई महात्मा गांधी, बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो व भारतीय संविधान घेऊन शांततामय मार्गांनी खंबीरपणे उभी ठाकली होती. दिल्लीतील शाहीन बाग सत्याग्रहाला पाठिंबा म्हणून गावोगावी महिला रस्त्यावर उतरत होत्या. ही परिस्थिती हाताळणे कठीण होत असताना करोनाला जागतिक महामारी म्हणून जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केले आणि दमनकारी यंत्रणेला सर्व आंदोलनांना, विरोधाला थोपविण्याची नामी संधी मिळाली. करोना मागे सर्व आर्थिक-सामाजिक अपयश दडवणे सोपे होईल म्हणून सुटल्यासारखेही वाटले असेल.

मात्र हा नॉव्हेल करोना व्हायरस या आधीच्या स्वाईन फ्ल्यू, इबोला यांच्या तुलनेत जास्तच चिवट निघाला. आजही यावर रामबाण म्हणावे असे एकही औषध नाही. हायड्रॉक्सी क्लोरोक्वीन या मलेरियाकरिता वापरल्या जाणाऱ्या औषधाचा कोव्हीडचे पेशन्ट हाताळणाऱ्या आरोग्यकर्मचाऱ्यांना प्रोफाय-लेक्टीक म्हणजे रोग होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक म्हणून उपयोग झाला. तसेच अगदी संसर्ग झाल्यावर सुरुवातीच्या काळात याचा उपयोग होऊ शकतो पण (गंभीर दुष्परिणामांची भीती असल्या कारणाने) ते फक्त डॉक्टरांच्या देखरेखीतच घ्यायला हवे. नव्याने निघालेले रेमिसिडिन हे व्हेंटीलेटरवर गेलेल्या रूग्णांचा जीव वाचविण्याची शक्यता वाढविते असे म्हणतात. साधारणपणे ६० टक्के जनतेला सौम्य आजार होऊन सामुहिक प्रतिकारशक्ती तयार होईपर्यंत साथ नैसर्गिक रितीने क्षमण्याची वाट बघण्याशिवाय पर्याय दिसत नाही. कारण लस तयार करण्याची कितीही चर्चा सुरू असली तरी किमान दीडदोन वर्ष लस उपलब्ध होण्याकरिता लागतात व आर्एन्ए विषाणूंच्या बाबतीत परिणामकारतेची शाश्वती नाही, त्या पलीकडे औषध कंपन्यांतील आर्थिक व राजकीय स्पर्धा. एच्आय्व्ही या एडस्च्या विषाणू विरोधात दोन दशके उलटून गेली तरीही लस तयार होऊ शकलेली नाही.

दोनतीन महिन्यानंतर आर्थिक कंबरडे मोडले म्हणून लॉकडाऊन शिथिल करण्याचा आग्रह झाला पण वैद्यकीय दृष्टीने परिस्थिती सुधरलेली नाही. बंद केलेले उद्योग सुरू करायचे तर स्वस्तात काम करणारे स्थलांतरित असंघटित मजूर परत येतील याची शाश्वती नाही, त्यांचे थकलेले पगार देण्याचे आश्वासन पाळता येणार का अशा अनेक अडचणी आहेत. नवीन गुंतवणूक मिळविण्याकरिता म्हणत मजुरांच्या हक्कांचे संरक्षण करणारे सर्व कायदे मोडीत काढण्याच्या प्रयत्न गेले वर्षभर सरकार करीत होतेच पण खरेतर हा फक्त बहाणा आहे, त्यामुळे गुंतवणूक वाढताना दिसत नाही. पर्यावरणीय आघातांबद्दलच्या जनसुनवाई-सारख्या गोष्टींना फाटा देत झटपट मान्यता देण्याचा, कोळसा खाणींना भरमसाठ परवाने वाटण्याचा सरकारने सपाटा लावला आहे पण अशा विनाशकारी प्रकल्पांच्या अट्टाहासापायी पर्यावरणीय संकट ओढवून घ्यायचे की लोकसहभागातून त्या त्या परिसरातील पर्यावरणाचे संवर्धन करत स्वस्थ मानवी समाजाचे हीत साधायचे ह्याचा प्राधान्याने विचार करायला हवा. जगभर असे अनेक प्रयत्न झालेले आहेत, त्यांचा स्वीकार करण्याचे धाडस दाखविणे, आर्थिक प्रगतीची दिशा बदलविणे गरजेचे आहे.

kolhekar.suhas@gmail.com

## कोरोनाने शिकवलेला धडा (उत्तरार्ध)

**(पान ७२ वरून)**

काही जण ग्रामसभेचे संघटन बांधण्याचा विचार करू लागले आहेत. कोरोना जणू काही सहयोगाची दीक्षाच देतो आहे. याशिवाय बृहत कुटूंब रचनेचेही संकेत मिळू लागले आहेत.

निराशेच्या घनघोर अंधकारात आशेचा एक किरण दिलासा देऊन जातो आहे. स्वावलंबनासाठी शेतकरी आणि त्यांचे सहयोगी श्रमजीवी बंधू यांनी स्वकश्टाने, आत्मविश्वासाने अन्न सुरक्षेची निश्चिती प्राप्त केली तर पहाट उजाडेल! मात्र त्यासाठी लफंग्या रूपयांच्या अर्थव्यवस्थेकडून लक्ष्मीचे वरदान प्राप्त केलेल्या अर्थव्यवस्थेकडे जर आपण वळलो तरच हे घडेल! सर्व भेदभाव विसरून एकत्र आलो, संघटित झालो तरच पुढे जाता येईल!

अर्थात तशी अर्थव्यवस्था स्वीकारणे ही शासनाच्या लोकाभिमुख यंत्रणेची, भूमिकेची अग्निपरीक्षाच असेल.

ulhasjajoo@gmail.com